# प्रकरण ४

# खंडाळा तालुक्यातील लोणंद परिसरातील धनगरी लोकगीते व लोकसंस्कृती यांचे बंध-अनुबंध

## प्रकरण – 4

## खंडाळा तालुक्यातील लोणंद परिसरातील

## धनगरी गीते व लोकसंस्कृती यांचे बंध–अनुबंध

निसर्गाच्या सहचर्याने, मानवी जीवनाची वाटचाल होत असते. निसर्गामध्ये घडत असलेल्या घटना लक्षात घेऊन मानव आपल्या जीवनाला अनुकूल आणि उपयुक्त असे बदल करून आणि वेळप्रसंगी त्यांच्यावर इष्ट ते संस्कार करून आपल्या जीवनाची वाटचाल करीत असतो. या वाटचालीत मानवाला बाह्य विश्वावर आपल्या स्वतःच्या मन आणि बुध्दीवर विजय मिळवून आपले जीवन यशस्वी करता येते. त्या वाटचालीत निसर्गाशी कधी कधी त्याला तडजोड करावी लागते व ती तडजोड करताना स्वतःचा देह, मन, बुध्दि, आत्मा यांच्यावरही संस्कार करावे लागतात व स्वतःमध्येही बदल घडवून आणता येतात. या दोन्ही क्रिया कळत नकळत एकाच वेळी घडत असतात. या घडलेल्या मानवी जीवनालाच आपण संस्कृती म्हणत असतो.

ही संस्कृती परंपरेने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे, दुसरीतून तिसरीत, चालत येत असते. म्हणूनच आपण तिला लोकसंस्कृती म्हणतो. ही संस्कृती सर्व समाजाची असते. कोणा एका व्यक्तीची नसते. जुन्याकडून नवे येत असते. जे चांगले असते व जे परंपरेने चालत येते. अशावेळी या संस्कृतीला आपण "जुने ते सोने" असेही म्हणतो. संस्कृती ही व्यक्तीच्या आयुष्याची दिशा निश्चित करते. व्यक्ती युगधर्माला, देशकालाला सामोरे जात असताना संस्कृतीमध्ये अनुरूप असे बदल घडत असतात. आप, तेज, वायू, आकाश, पृथ्वी हे मानवी जीवनाला सोबत करीत असतात. ही पंचमहाभूते मानवी जीवनाला अंतर्बाह्य व्यापून राहिलेली आहेत. त्यामुळे संस्कृती ही मानवाचे अंतर्बाह्य जीवन व्यापून राहते. संस्कृतीला स्थूलमानाने आधिभौतिक, आधीदैविक, व अध्यात्मिक अशी तीन अंगे असतात. बाह्या विश्वावर संस्कार करून मानवाच्या उन्नतीसाठी व्यक्तीला उपकारक बनविणे. यालाच संस्कृतीचा आदीभौतिक विभाग म्हणतात. शेती, पशुपालन, स्थापत्य, धातुकाम, यंत्रनिर्मिती, नगररचना, औषधे, संशोधन, अल्पोत्पादन या सर्व गोष्टीचा

समावेश आधिभौतिकमध्ये होतो. जीवन सुखी व्हावे, संकटाचे निवारण व्हावे, म्हणून पुजाअर्चा करणे, जप तप करणे, मंत्रतंत्र, प्रार्थना करणे, जादूटोणा करणे याला संस्कृतीचा अधिदैविक विभाग म्हणता येईल. यामध्ये अदृश्य दैवी शक्तीचे साह्य प्राप्त करून घेण्याचा हेतू असतो.

निरनिराळया यात्रा जत्रा करणे, देवदेवींची, कुलदैवतांची पूजा करणे, त्यामुळे जिव्हाळा प्रेम, कृतज्ञता, विविध गुणांचा वारसा प्राप्त करून घेणे इ. जाणीव होते. यालाच आपण संस्कृती म्हणतो. आजपर्यंत अशा ग्रामदैवतांच्या पूजा, कुलदैवतांच्या पूजा होत आल्या त्यामुळे आदिमकाळाची कहाणी उलगडत गेली. उदा.शिखर शिंगणापूरची कथा वाचल्यास नाथ पंथाचा प्रसार कसा होत गेला हे समजते. होळीच्या सणातून कोकणात चालू असलेल्या सणांची कल्पना येते. कारण कोकणात होळीचा सण मोठा समजला जातो. ऊरूसात होणारे, जत्रेत होणारे तमाशे, कलगीतुरे आजही चालू आहेत. पौराणिक कथातील मनोरंजक भाग त्यात आधाराला घेतलेला असतो व त्या आधारे लोकमानसातील अनेक कल्पना त्यात मिसळून कथा रचना केलेली असते. उदा.देवीच्या कुळकथातील कथा, गोंधळयांनी त्यावर रचलेली गीते इ. मध्ये इतिहासाच्या खुणा जपलेल्या आढळतात. अशाप्रकारे सांस्कृतिक इतिहास लोकसाहित्य जपून ठेवते यामध्ये संस्कृतीचा आध्यात्मीक भाग येतो.

सांस्कृतिक इतिहास लोकसाहित्य जपून ठेवत असते. धनगरी गीतेही त्याला अपवाद नाहीत. धनगरी गीते हा लोकसाहित्याचाच एक भाग आहे.

लोकसंस्कृती आणि धनगरी गीते यांचा अतूट संबंध आहे. धनगरी गीते त्या लोकसंस्कृतीशी एकनिष्ठ झालेली आढळतात. धनगरी गीतातून संस्कृतीची अनेक वैशिष्टये पाहावयास मिळतात. लोकसंस्कृतीमधील अनेक गीतातून त्याकाळाचे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक जीवन व्यक्त होत असते. लोकसंस्कृती ही समाज जीवनाला घडवित असते. कलेचा आविष्कार हा त्या संस्कृतीतून होत असतो. म्हणून लोकसंस्कृती व धनगरी गीते यांचा संबंध लक्षात घ्यावा लागतो.

अस्थिरता हा धनगर समाजाच्या सांस्कृतिक जीवनाचा स्थायीभाव आहे. धनगर समाजाचे जीवन सतत भटके असल्यामुळे इतर जातीधर्माच्या समाजाशी त्याचा संबंध आला. देवधर्मातील पूजा, त्यांच्या कला याचा स्थानिक लोकांच्या संस्कृतीशी संबंध आला. सतत भटकणाऱ्या जीवनामुळे त्याच्या श्रध्देत अधिकच वाढ झाली. काळाबरोबर बदलत राहणे हेही या समाजाला मान्य झाले आहे. शिक्षणामध्ये या समाजाने प्रगती केली. मानसिक स्वास्थ्यासाठी भूमी, दगड, माती, वृक्ष, प्राणी, पाणी यांचे महत्व त्याच्या लक्षात येवू लागले. धनगरी समाजावर त्या त्या ठिकाणचे संस्कार होतात. उदा.बारसे, विवाह, अंत्यसंस्कार इ. पण तरीही त्यांच्या मध्ये काही बाबतीत वेगळेपणा आढळतो. उदा.जत्रा—यात्रा, कला इ. अशा या धनगर लोकांनी आपला वेगळेपणा जपण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु प्रत्येकाचे जीवनमान एक सारखेच असते. म्हणून लोकसंस्कृती व धनगरी गीते यांचा संबंध निकटचा आहे.

धनगरांची विवाहपध्दती ही हिंदू संस्कृती प्रमाणेच आहे. सतत भटकंती असल्यामुळे प्रत्येक ठिकाणच्या वेगवेगळया माणसांचे स्वभाव, त्यांचे वागणे, त्याचे बोलणे, राहणे, खाणे अशा अनेक गोष्टींचा त्याला परिचय होतो आणि आपल्यातील चुका त्याच्या लक्षात आल्यानंतर दुरूस्त करून घेतो. गावातील यात्रेच्या वेळी, मुख्य सणाला ते ओव्या म्हणत असतात. आपल्या ओव्यातून ते ऐतिहासिक शूर, धाडसी लोकांचा जीवनपट उभा करतात. लोकांचे मनोरंजन करतात. त्यांना लोकशिक्षण देतात.

धनगर समाजात हिंदू संस्कृती प्रमाणे गुढीपाडवा, पंचमी, पोळा, दसरा, दिवाळी, शिमगा, चंपाषष्ठी इ. सण साजरे केले जातात. यावरून धनगरी गीते व लोकसंस्कृती यातील अनुबंध आपल्या लक्षात येतो. तशाच प्रकारे धनगर समाजात इतर समाजासारखी अंधश्रध्दा पाहावयास मिळेल. आपला प्रप्रंच चांगला चालावा, व्यवसायात फायदा व्हावा, लेकी सुनाला मूल बाळ व्हावे म्हणून आपल्या कुल दैवतांना ते बकरं कापतात. काहीजण रविवार धरून आपली इच्छा पूर्ण झाल्याचे इतरांना सांगतात.

धनगरी लोकांचा संबंध ऊन, वारा, पाऊस, डोंगर, नद्या यांच्याशी येत असला तरी जत्रा–यात्रा, सण, समारंभ या निमित्ताने त्यांना लोकात मिसळावे वाटते व त्यांच्याही भ्रमंती स्वरूप असलेल्या संस्कृतीचे संवर्धन होते. आणि नकळत तिला स्थैर्य व स्थैर्याचे महत्व कळते. वणवण रानोमाळी फिरल्याशिवाय जीवनमान जगणे धनगर समाजाला कठीण असते. स्थिर व अस्थिर संस्कृतीचा समन्वय साधून धनगर समाजाला पोटासाठी स्थलांतर करणे अपरिहार्य ठरते. भटकया जीवनाशिवाय त्याला पर्यायच नसतो. मेंढयाच्या सहवासात, त्यांच्या पोटासाठी रानोमाळ, कडीकपारी फिरता फिरता त्याला आपले पोट भरता येते. पिढयानुपिढया चालत आलेल्या धंद्याशी तो प्रामाणिक आहे. विज्ञान युगात कितीतरी भौतिक सुखे प्राप्त होत अस्तानाही तो त्या सुखात अडकून पडलेला नाही. तो रानोमाळ, रस्ते, डोंगरकपारी तुडवितच राहीला आहे. याच्या ठिकाणी असणारा जीवनप्रवासाचा व व्यवसायाच्या दृष्टीने पोटापाण्याचा धंद्यातील प्रामाणिकपणा, शेळयामेंढया गुरे–ढोरे यावर त्याचे असणारे प्रेम, सण–वार, यात्रा–जत्रा हा त्याच्या संस्कृतीचा अतुट भाग आहे. त्याच्या या जीवनाचा बंध–अनुबंध, त्याने गायलेल्या लोकगीतातून उत्कटपणे प्रकट झालेला आहे. जीवापाड जपणाऱ्या आपल्या शेळया मेंढयाबद्दल तो म्हणतो की,

"न्हानीयाल्या मेंढया कृष्णाबाईला वेडा ठेव
मग मेंढयाची म्होर लाव"
"पडीतो मेघराजा पड तपल्या मनमानी
शेळया–मेंढयाच्या दैवानी"
"कातरल्या मेंढया करती आटाणा गूळ पोळी
तान्ह्या या राघुबाला मेंढी सख्याला मायंदाळी"
"पडीतो मेघराजा तोतर पडुनि बर केलं
तान्ह्या या राघुबाच नंदी तासाला पाणी प्याला"

आपल्या लेकी सुनाबद्दल तो आपल्या कौटुंबिक भावभावना व्यक्त करीत असताना म्हणतो की –

"लेकीचा जलम जसा गाजराचा वाफा
नांदाय गेली लेक भकास दिस सोफा"
"लेकीचा जलम कुणी घातला येडयान
सोयऱ्याच्या घरी बैल राबतो भाडयानं"

दळण दळताना एखादी स्त्री ही आपल्या कुटुंबाचे कल्याण करण्यासाठी खंडोबाचे गुणगान करताना म्हणते की,

"दोघी या बायकाची चाल निघाली या देवादारी
जेजूरीच्या देवाला मल्हारी हौशाला दोघी नारी
म्हाळसापेक्षा बानू आणीली चढाची
ईगून नाही दिली पायरी गडाची
म्हाळसाबाई बोले हेगडे प्रधान माझ्या भावा
बानू गडाच्या खाली ठेवा
म्हाळसा बाईवरी बानू आणीली दुरूनी
आठ दिवसाच्या आईतवारी पड भंडार चोरूनी
म्हाळसा वाण्याची बानू आहे धनगराची
दोघी बसल्या एका ताटी देवा मल्हारी तुझ्यासाठी."

आपल्या घरधन्याला आयुष्य लाभावे म्हणून खंडोबाला व बिरोबाला नवस करते की,

"खंडोबा, बिरोबाच नाव. माझ्या मुखी
देवा समधी राहू दे रे माझी सुखी "
"आई तू मरीमाता तुझं सोन्यायाच गोठ
जलम जाऊ दे माझं कुंकवाचं बोट"

घरात आजारी असलेल्या आपल्या बालकाविषयी ती म्हणते –

"जिवाला बाळाच्या जड डोक दुखत राहवनी
देवा या बिराजीला आण वैद्याला जाऊनी"

" जिवाला बाळाच्या जड डोक दुखत केसामधी
देव ये बिराजी वैद्य सर्व्या देशामधी "

अशाप्रकारे ती परमेश्वराची व्रतवैकल्ये करून बाळ बरा होण्यासाठी आळवणी करते. आणि आपणाला मुलबाळ व्हावे, माहेर सुखी असावे, मुलापेक्षा तिला मुलगीच अधिक आवडते असे संपूर्ण तिच जीवन मान खालील गीतातून व्यक्त होते.

"देवाच्या देवळात नंदीला शेला लाल
करा नवस कबूल
देवांच्या देवळात पुत्रांची काय वाण
माग कन्या आवडीन
देवाच्या देवळात देवाला घाला माळ
मागा पोटी ताने बाळ
देवाच्या देवळात रोज चढते, पायरी
सुख मागते माहेरी
देवाच्या देवळात नको जाऊ कधी सडी
भावाचा बाळ घे कडी"

धनगर स्त्री फक्त परमेश्वराजवळ एकच मागणे मागते ती म्हणते –

"आई तू मरीमाता तुझी सोन्याची निरी
जलम जाऊ दे माझी कुंकवाची चिरी."

धनगर समाज जशी खंडोबाची मनोभावे पूजा, भक्ती करतो तशीच तो पंढरपूरच्या विठ्ठलाची भक्ती करतो. पंढरपुरचा विठोबा आणि जेजूरीचा खंडोबा यांच्यात किती साम्य आहे हे पुढील विवेचनावरून स्पष्ट होते.

विठ्ठलाची भक्ती करणारे अनेक भक्तगण आहेत तर खंडोबाचे भक्त वाघ्यामुरळी होत. विठ्ठलाच्या पत्नीचे नाव रूखमाई तर खंडोबाच्या पत्नींची नावे म्हाळसा व बानाई होय. विठ्ठल विटेवर उभा आहे. तर खंडोबाची घोडयावर शोभा आहे. विठ्ठलाचा खरा भक्त, "कुंडलीक " आहे तर जेजूरीला "हेगडे प्रधान" आहेत. विठ्ठलाला बुक्का महत्वाचा आहे तर खंडोबाला भंडारा प्रिय आहे. विठ्ठलाच्या समोरून चंद्रभागा नदी वाहते तर खंडोबाच्या जटेतून गंगा नदी वाहते. विठ्ठलाला मृदुंगाच्या टाळाचा गजर असतो. तर खंडोबाला वाघ्या-मुरळयांचा घोळ असतो.

धनगर समाज सतत भटकत असल्याने "रात्र होईल तेथे राहणे, मिळेल ते खाणे" हे त्याचे ठरलेले असते. त्यामुळे डोंगराच्या अंगाखांद्यावर हा समाज वावरतो. त्याच्या कुशीत झोपतो आणि आपल जीवन आनंदाने जगत राहतो. आपल सुखदुःख त्याने कधीही दुसऱ्याला सांगितले नाही. जे असेल ते मुकाटपणे सोसत जाणे. अशा शांत स्वभावाचा, सतत अहोरात्र कष्ट करणारा, अहोरात्र मेंढयावर लक्ष ठेवणारा, त्यांना जीवापलीकडे जपणारा, एकूणच संकटाशी सामना करणारा, दुःखास सुख मानणारा, असा हा धनगरी समाज आहे.

धनगरी समाजाची राहणी साधी आणि सरळ आहे. त्याची भाषा साधी, सोपी आणि मराठी वळणाची आहे. अशा प्रकारच्या अनेक लोककलाद्वारेच महाराष्ट्राची सांस्कृतिक परंपरा टिकून राहिली आहे.

एकंदरीत धनगरी लोकगीते भावनिकतेने नटलेली व रसरसलेली आहेत. दिवाळीच्या सणाला आपल्या भावाला भेटता आले नाही तर चंद्राला ती ओवाळते आणि चंद्राच्या गाभ्यात आपल्या भावाची मूर्ती पाहते. उदा.सासरी नांदणारी धनगर स्त्री आपल्या माहेरच्या माणसाचा

अभिमान व्यक्त करते व त्याच्या आठवणीवर सुखदु:ख पचविते. उदा.वर्षातून ती एकदा ती खंडोबाला जाते व नवस करते. हाच मानवी जीवनाचा बंध-अनुबंध लोकगीतामधून शब्दाशब्दातून प्रकट होतो. अशा लोकसाहित्याला मानवी जीवनाचा झालेला स्पर्श सोन्याहून पिवळा असतो. म्हणूनच आजही 21 व्या शतकाकडे वाटचाल चालू असताना वैज्ञानिक, झेप घेऊन माणूस चंद्रावर पोचला असतानासुध्दा लोकसाहित्याचे आकर्षण यत्कींचीतही कमी झालेले नाही. ते अधिकाधिक वाढतच चाललेले आहे. लोकसाहित्याचे हे आकर्षण लक्षात घेता मानवी जीवनाच्या उगमापासून अंतापर्यंत हे नाते अतुट असे राहणार आहे. हा जीवनाशी असलेला बंध-अनुबंध हा लोकसाहित्याचा प्राण आहे.

लोकगीतातून हा अनुबंध अधिक जिव्हाळयाने, भावनिक अनुभूतीने जपण्याचे श्रेय मानवालाच द्यावे लागते. मानवाशिवाय, समाजशिवाय, लोकांच्याशिवाय लोकसाहित्य नाही. आणि लोकसाहित्यातील लोकगीतांनी मानवी जीवनाचा बंध-अनुबंध टिकविण्याची आपली ताकद परंपरेनं बळकट केली आहे व भावी काळातही ती अधिकाधिक बळकट होत राहणार आहे. लोकगीतातील साधेपणाने गुंफलेल्या मानवी जीवनाचा आविष्कार किती लोभस, वास्तव, परखड आणि उत्कट असतो. हे ही आपण लोकगीताचा रसास्वाद घेतलेल्या प्रकरणात पाहिलेले आहे. या वैशिष्टयामुळे लोकगीते म्हणजेच लोकसाहित्य असा गैरसमजही तसा पसरलेला आहे. हे ही आपण पाहिलेले आहे. लोकगीते हा लोकसाहित्याचा एक भाग आहे.पण या भागाने जीवनाशी जोडलेला बंध अनुबंध हा अतुट आहे हेच खरे. पर्यायाने धनगरी गीतांचेही वैशिष्टय हेच आहे. ही धनगरी गीते लोकसाहित्याचा एक भाग आहेत. ती लोकगीतामध्येच समाविष्ट झालेली आहेत. फक्त अभ्यासासाठी वेगळी केलेली आहेत. या लघु प्रबंधाच्या दुसऱ्या प्रकरणांत लोकसाहित्याचे स्वरूप व वैशिष्टये याचाही विचार केला आहे. एकंदरीत आशय - विषय - अभिव्यक्तीची एकरूपता व सहजस्वाभाविकता लोकसाहित्यातील लोकगीताइतकी अन्य कोणत्याच वाड्.मयात आढळत नाही. तेच धनगरी गीतासंबंधी म्हटले तर वावगे ठरणार नाही.